# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

दुरध्वनी क्र. (0240)-2333536-40 फॅक्स क्र. (0240) 2331213


जा.क्र/मनपा/का.अ./पा.पु./2026/35 — दिनांक : 01/07/2026

## अधिकृत नळ जोडणी कार्यपद्धती (SOP)

छत्रपती संभाजीनगर नवीन शहर पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. या योजनेअंतर्गत शहरातील 90,000 नागरिकांना नवीन नळ जोडण्या देण्याचे समाविष्ठ होते. तथापि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत प्रत्यक्षात आज पर्यंत एकुण 45,000 नळ जोडण्या दिलेल्या आहेत. मजीप्रा व मनपाच्या अभियंत्यां समवेत मा. आयुक्त महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. बैठकीमध्ये शहरातील नो-नेटवर्क भागातील नळ जोडण्या, अधिकृत नळ जोडण्या स्थलांतीरत करणे, नेटवर्क भागात नवीन नळ जोडण्या देणे इ. कामे लवकरात लवकर पुर्ण होणे करीता सदर काम मनपा मार्फत पुर्ण करण्याचा निर्णय झाला आहे. त्या अनुषंगाने परवानाधारक नळ कारागीर (प्लंबर) यांना प्रति नळ कनेक्शन शुल्क रू.1,800/- असा दर निश्चित करण्यात आला आहे.नळ जोडणी साठी आवश्यक असणा-या साहित्यांचा पुरवठा महानगरपालिकेच्या माध्यमातुन करण्यात येणार आहे. कामाचे प्राधान्य लक्षात घेता मा.आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी उक्त बाबीस मान्यता प्रदान केली आहे.

**अधिकृत नळ जोडणी अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे अधिकृत कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे :-**

1. नागरिकांनी अधिकृत नळ जोडणी घ्यावी, यासाठी महानगरपालिकेचे लाईनमन व अभियंते आपापल्या क्षेत्रात नागरिकांना प्रत्यक्ष भेटून आवाहन करतील त्याच प्रमाणे या बाबीस व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात येईल.
2. अधिकृत नळ जोडणी संदर्भाने महानगरपालिकेचे परवानाधारक नळ कारागीर नागरिकांना प्रत्यक्ष भेटुन नळ जोडणीसंबंधीची कागदपत्रे जमा करतील.
3. नळ कनेक्शन घेणेकरीता चालु वर्ष सन 2026-2027 साठीची मालमत्ता कर भरणा केल्याची पावती, आधार कार्ड, एक पासपोर्ट साईज फोटो, मालकी हक्काची कागदपत्रे, इत्यादी दस्तावेज उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.
4. सदर कागदपत्रे व नळ कनेक्शनचा अर्ज परवानाधारक नळ कारागीर पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी महानगरपालिकेच्या त्या-त्या प्रभागातील क्षेत्रीय अभियंत्यांकडे सादर करतील.
5. त्यानंतर आवश्यक ठिकाणी कॅम्प लावुन महानगरपालिकेचे प्रभाग अभियंते, उप अभियंता तसेच कार्यकारी अभियंता प्राप्त कागदपत्रे व नळ कनेक्शन अर्जांची छाननी करुन दोन दिवसांत नळ संचिका मंजुर करतील.
6. अर्जदाराकडुन आवश्यक शुल्क ऑनलाईन पध्दतीने महानगरपालिकेस अदा झाल्यानंतर परवानाधारक प्लंबर मार्फत क्षेत्रिय अभियंत्या समक्ष संबधीत अर्जदाराला रीतसर नळ जोडणी देण्यात येईल.

नळ जोडणीसाठी महानगरपालिका अर्धा इंच रहिवासी नळ जोडणीसाठी खालील प्रमाणे शुल्क आकारणी करणार आहे.

| अ.क्र | विवरण | | रक्कम रु |
|---|---|---|---|
| 1. | एक वर्षाची आगाऊ पाणीपट्टी रक्कम (उदा. १/२" निवासी नळ जोडणीकरिता) | : | रू.2,025/- |
| 2. | नळ कारागीर फीस | : | रू.1,800/- |
| 3. | अर्ज शुल्क, तपासणी शुल्क, रस्ता दुरुस्ती (सरासरी खर्च), Online Application Development इतर साहित्याचा खर्च | : | रू.2,175/- |
| | **नळ जोडणीच्या नस्तीचा (फाईलचा) एकुण खर्च रु** | : | **रू.6,000/-** |

नळ जोडणीचा आकार व घरगुती / व्यावसायिक वापर यानुसार नळ जोडणीच्या एकुण शुल्कांमध्ये खालील प्रमाणे बदल होतील.

**निवासी वापरासाठीचे नळ जोडणीच्या आकारानुसार दर**

| नळ जोडणीचा आकार | ½ इंच | ¾ इंच | १ इंच | १.५ इंच | २ इंच | ३ इंच | ४ इंच | ६ इंच | ८ इंच |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आगाऊ पाणीपट्टी (रू.) | २०२५/- | ३२००/- | ७४५०/- | ३२६२५/- | ५४३५०/- | ८६९७५/- | १३०४५०/- | २१७४२५/- | ३२६१५०/- |
| नळ कारागीर फीस (रू.) | १८००/- | १८००/- | १८००/- | १८००/- | १८००/- | १८००/- | १८००/- | १८००/- | १८००/- |
| इतर शुल्क (रू.) | २१७५/- | २१७५/- | २१७५/- | २१७५/- | २१७५/- | २१७५/- | २१७५/- | २१७५/- | २१७५/- |
| एकुण शुल्क (रू.) | ६०००/- | ७१७५/- | ११४२५/- | ३६६००/- | ५८३२५/- | ९०९५०/- | १३४४२५/- | २२१४००/- | ३३०१२५/- |

| व्यावसायिक वापरासाठीचे नळ जोडणीच्या आकारानुसार दर | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नळ जोडणीचा आकार | ½ इंच | ¾ इंच | १ इंच | १.५ इंच | २ इंच | ३ इंच | ४ इंच | ६ इंच | ८ इंच |
| आगाऊ पाणीपट्टी (रू.) | २०१५०/- | ३१८००/- | ७४५००/- | ३२६१५०/- | ५४३५५०/- | ८६९७००/- | १३०४५५०/- | २१७४२००/- | ३२६१३००/- |
| नळ कारागीर फीस (रू.) | १८००/- | १८००/- | १८००/- | १८००/- | १८००/- | १८००/- | १८००/- | १८००/- | १८००/- |
| इतर शुल्क (रू.) | २१७५/- | २१७५/- | २१७५/- | २१७५/- | २१७५/- | २१७५/- | २१७५/- | २१७५/- | २१७५/- |
| एकुण शुल्क (रू.) | २४१२५/- | ३५७७५/- | ७८४७५/- | ३३०१२५/- | ५४७५२५/- | ८७३६७५/- | १३०८५२५/- | २१७८१७५/- | ३२६५२७५/- |

**(वसंत भोये)**
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका